पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा. स्थायी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – १५८

# सभावृत्तांत

दिनांक – **०७/०३/२०१५** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा शनिवार दिनांक **०७/०३/२०१५** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात **मा.कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद पुणे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा. कांतीलाल उमाप** – पिठासीन अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, पुणे
२. मा. गायकवाड संध्या सुरदास
३. मा. तरस बाळासाहेब जयवंत
४. मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
५. मा. प्रसाद शेट्टी
६. मा. आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७. मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
८. मा. कैलासभाऊ गबाजी थोपटे
९. मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१०. मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.तानाजी शिंदे – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.दुरगुडे, मा.गायकवाड, मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.पवार – अतिरिक्त कायदा सल्लागार, मा.बोदाडे - प्रशा.अधिकारी - जनता संपर्क विभाग हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.पिठासीन अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी -** सन्मा. सदस्य, मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मुक्त व

निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामाकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**नगरसचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा.नगरसचिव -** मा. स्थायी समितीचे सभापती पदावर मुं.प्रां.म.न.पा.अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) नुसार नेमणुक करणेकामी एकूण २ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नांव** | **सुचकाचे नांव** | **अनुमोदकाचे नांव** |
|---|---|---|---|
| १) | अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे | कैलासभाऊ गबाजी थोपटे | ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी |
| २) | अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे | सौ.साळुंके सविता सुरेश | तापकीर अनिता मच्छिंद्र |

( मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त २ नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्यांची छाननी केली. )

**मा.पिठासीन अधिकारी - तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** मा.स्थायी समितीचे सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एकूण २ नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून ती दोन्ही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

( मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दुपारी १२.०२ ते १२.१७ हा १५ मिनिटांचा कालावधी संपला.)

**मा.पिठासीन अधिकारी - तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये मा. स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - १०९१८ विषय क्रमांक - १

दिनांक - ०७/०३/२०१५ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या २ (दोन) नामनिर्देशन पत्रांमधील मा. स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **स्थायी समितीचे सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**---------**

यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

**( कांतीलाल उमाप )**

पिठासीन अधिकारी

स्थायी समिती (विशेष सभा)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/२१३/२०१५

दिनांक : ०७/०३/२०१५



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.